K. S. Wani Memorial Trust Dhule

NEWS BULLETIN

Volume 3

संपादक मंडळ

प्रा. डॉ. शोभा शिंदे (मुख्य संपादक)

सौ.वैशाली सोनगिरे (उप संपादक)

प्रा. प्रसाद पुराणिक (सह संपादक)

K S Wani Memorial Trust Reg. No. E-352

K. S. WANI INSTITUTE DHULE

NEWS LETTER

(Oct. 2018 –Dec. 2018)

(For Private Circulation only)

North Maharashtra University, conducted semester examination in which 48 students appeared for the I[st] semester examination out of them 45 students passed successfully in the examination. Swapnil Patil passed, first class with distinction and Ajay Patil second rank with distinction.

45 students appeared for III[rd] Semester of Diploma in Printing Arts out of them 44 students passed successfully Harde Sagar Diwakar passed first class with distinction and Kadam Sagar Suresh second class with second rank Distinction in the final year Printing Arts diploma course.

Congratulations to all of them !!!



Patil Swapnil



Patil Ajay



Harde Sagar



Kadam Sagar



कर्मचारी बांधवाना मिठाई वाटप करताना संस्थेचे विश्वस्त

दीपावली निमित्त मिठाई वाटप

दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी देखील संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त मिठाई वाटप कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे विश्वस्त मा. डॉ. एन. एम. जैन व संस्थेच्या सचिव मा. डॉ. शोभा शिंदे ह्या वेळी उपस्थित होते. सर्व कर्मचाऱ्यांना विश्वस्त मंडळाकडून दीपावली निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. मा. डॉ. एन. एम. जैन यांनी यावेळी मार्गदर्शन केले .

स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन या संस्थेमार्फत विविध कार्यक्रम संपन्न

आदरणीय डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या प्रेरणेने स्थापन झालेली मानसिक आजारी व्यक्तींसाठी आशेचा किरण असणारी पुणे येथील संस्था म्हणजेच स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था ('सा') ही होय.

१० सप्टेंबर २०१८ ' हा डॉ. वाणी यांचा जन्मदिवस असतो. यानिमित्त संस्थेतील पालकांचे अनुभव व त्यानंतर तज्ज्ञांचा **'Mental Health Care Act 2017'** यावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. '१० ऑक्टोबर ' हा दिवस 'आरोग्य दिवस' म्हणून पाळला जातो. '४ ऑक्टोबर २०१८ ' रोजी धायरी येथे पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. '१० ऑक्टोबर २०१८ ' रोजी मानसिक आजारी व्यक्तींच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर झाला. '१८ डिसेंबर ' हा 'सा' चा वर्धापनदिन असतो. कलंकाची भावना, पूर्वग्रह दूषित मते व यामुळे मानसिक आजारी व्यक्तींना समाजात सामावून न घेणे होय. हा अडसर कसा दूर करता येईल याविषयीचा एक परिसंवाद पुण्यातील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित करण्यात आला होता.







स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन कार्यक्रमातील उपस्थित मान्यवर







Sandeep Foundation Eye Camp Hon. Guest

Sandeep Foundation Eye Camp

Sandeep Foundation held their annual Eye Camp 2018 at Dhule (Maharashtra) on Sunday, 18th November 2018 at the Sharda Netralaya - under the flagship of Kamlini Wani Hospital, Dhule - with the active support of Shri Parshvanath Sewa Kendra - In the loving Memory of "Revered Dada JP Vaswani."

Mr .Sunder Lalwani and Jai Motiani were fortunate to represent Sadhu Vaswani Mission Mumbai at Dhule - as we have been associating with them since last many years for this blessed cause. Total OPD on the day crossed record 2847 in numbers out of which cataract detected patients were 1797. All urgent cases were taken up for immediate operation and Refraction dates were given to remaining 1050 patients.

चंद्रकांत केले मेडिकल अँड रिसर्च फाउंडेशन

सामाजिक बांधिलकीतून ज्येष्ट उद्योजक श्री चद्रकांत केले यांनी पुढाकार घेऊन धुळ्यात दोन कोटीची अद्ययावत डायलिसीसची सुविधा "चंद्रकांत केले मेडिकल अँड रिसर्च फाउंडेशन "या संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. यात फक्त २५० रुपयामध्ये डायलिसीस उपचार प्रक्रिया केली जाते. उत्तर महाराष्ट्रातील हा पहिलाच उपक्रम असून या सेंटरमध्ये एकाचवेळी सात रुग्णांवर डायलिसीस करता येते. दिवसभरात दोन शिफ्टमध्ये १४ रुग्णांवर ही प्रक्रिया केली जाते. एका रुग्णांला साधारण चार तासाचा वेळ लागतो. धुळे शहरातील आतापर्यंत २१०० रुग्णांना याचा लाभ झाला आहे.





Chandrakant Kele Medical & Research Foundation

Niradhar Aadhar

Late R.M Jain Public trust, Dhule, came into being in the year 1981. In the course of time, the trust could successfully organize various projects. Last year (2018) the idea clicked in the mind of trustees to extend the helping hand to those high-school going students who have lost, both, mother and father. We feel that the financial difficulties of their relatives may create the hurdles in their way and such students may be compelled to give up the education or may adhere to low-paid jobs. Not only that they may succumb to religious conversion or unfair malpractices. To avoid such calamities, the trust introduced "Niradhar Aadhar" project. Till date, the trust has collected reliable data of orphan students from local high-schools. We could provide the articles such as school-uniform, text books, school bags, bi-cycle as per their needs.

Respected Rameshbhai's generosity strengthened the foundation of this project. We hope that the trustees of K.S. Wani memorial Trust will definitely join hands and will guide from time to time to make this project a campaign.



Financial help to Niradhar Students

रतीबाई जैन ट्रस्टला मिती गृपतर्फे २५ हजारांचा पुरस्कार

मुंबईतील मिती गृपतर्फे धुळे येथील मगनलाल जैन पब्लिक ट्रस्टला २५ हजार रुपयांचा पुरस्कार व गौरव पत्र देण्यात आले. समाजातील काही दिव्यांगासाठी सेवा करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना हा पुरस्कार दिला जातो. "गगनाला पंख नवे" या कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी का.स.वाणी प्रतिष्ठानचे विश्वस्त व रतीबाई ट्रस्टतर्फे प्रा.डॉ. एन.एम. जैन व प्रा.सौ.सूर्यप्रभा जैन यांनी पुरस्कार स्वीकारला.



पुरस्कार स्वीकारताना प्रा.डॉ. एन.एम. जैन

E-109 / MIDC प्रिंटींग युनिटचे विस्तारीकरण

संस्थेच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या वास्तूचे विस्तारीकरणाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच एका भव्य वास्तूचे निर्माण होऊन व्यावसायिक व शैक्षणिक कार्यवृद्धिसाठी व्यवस्थापनाने अतिशय चांगला निर्णय घेऊन संस्थेच्या विकासात भर घातली आहे.





शेख सादिया अब्दुलसमाद यांना प्रा.ए.आर.कामत पुरस्कार जाहीर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांख्यिकी विषयातील बी. एस्सीच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत येणाऱ्या गोल्ड मेडेलिस्ट शेख सादिया अब्दुलसमाद यांना डॉ. जगन्नाथ वाणी यांनी दिलेल्या उदात्त निधीतून स्व. प्रा.ए.आर.कामत स्मरणार्थ २०१७ चा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून **Advance Diploma in Print Packaging Art हया नवीन अ**भ्यासक्रमाचा प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठात दाखल करण्यात आला आहे त्याबाबत विद्यापीठामार्फत स्थापन केलेल्या चार सदस्यीय समितीने नुकतीच संस्थेस भेट देऊन त्या बाबतचा प्राथमिक अहवाल विद्यापीठास सादर केला असून पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव वर्ग करण्यात आला आहे. अभ्यासक्रमास मंजुरी मिळेल व लवकरच हा अभ्यासक्रम संस्थेतून सुरु होईल या बाबत व्यवस्थापनाकडून प्रयत्न सुरु आहेत.

- **K. S. Wani Memorial Trust and Sandeep Foundation's (Sharada Netralay) jointly started Diploma in Optometry and Diploma in Ophthalmic Science. Courses under MUHS Nasik**

We accept donation from well wishers

- *Bank account: Account No. – 35147550561*
  IFSC Code: SBIN – 0001938
  State Bank of India, Pramod Nager Branch, Deopur, Dhule (Maharashtra)
- *Email Id : kswprint@gmail.com*

K S Wani Memorial Trust Reg. No. E-352

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित

बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

ऑक्टोबर– डिसेंबर २०१८

(For Private Circulation only)

ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ या कालावधीत ३५ गावातील ६५ अंगणवाड्या व ७२ शाळांमध्ये एकूण २०४३० विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.तपासणी दरम्यान ४३८ विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालय येथे पाठविण्यात आले. त्यापैकी १०० विद्यार्थी प्रत्यक्ष शारदा नेत्रालय येथे येवून गेले व १० विद्यार्थ्यांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याचप्रमाणे १५४ विद्यार्थ्यांना मोफत चष्मा नंबर काढून देण्यात आला. त्यापैकी २८ चष्मे मोफत,९ चष्मे अल्पदरात देण्यात आले व ११९ विद्यार्थी स्वत: चष्मे बनवून घेणार आहेत.



शस्त्रक्रिये पूर्वी



शस्त्रक्रिये नंतर



शस्त्रक्रिये पूर्वी



शस्त्रक्रिये नंतर





विद्यार्थ्यांना पाहुण्यांचे हस्ते मोफत चष्मे वाटप

त्याचप्रमाणे २६८१ जेष्ठ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ४७९ जेष्ठ नागरिकांना शारदा नेत्रालय येथे पाठविण्यात आले. यामध्ये ४०५ नागरिकांना मोतीबिंदू असल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी ८३ नागरिक प्रत्यक्ष शारदा नेत्रालय येथे येवून गेले व ६७ नागरिकांची शस्त्रक्रिया करण्यात आली.

ऑक्टोबर महिन्यात एमएसएसओ चे उपाध्यक्ष मा. श्री रमेशजी अगरवाल सर, सौ. विजय अगरवाल मॅडम व त्यांच्या सोबत श्रीमती मधु सेहगल यांनी प्रकल्पाला गुढे ता. चाळीसगाव जि. जळगाव येथे भेट दिली व तेथील अंगणवाडीतील तपासणी ,जेष्ठ नागरिकांची तपासणी व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी बघून समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शशिकांतजी धामणे, आश्रम शाळा गुढे चे संस्थापक श्री महाजन सर व आलेल्या पाहुण्यांच्या हस्ते गरजू मुलांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिवाळीनिमित्त गरीब व गरजू मुलांना एमएसएसओ चे उपाध्यक्ष मा. श्री रमेशजी अगरवाल सर, श्रीमती सौ. विजय अगरवाल व त्यांच्या सोबत श्रीमती मधु सेहगल यांच्या हस्ते नरव्हाळ भिलाटी येथे कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे येथील लोकांमध्ये स्वच्छतेची जाणीव करण्यासाठी अंघोळी साबण , टूथ पेस्ट, खोबरेल तेलाचे पाउच व बिस्किटांचे वाटप करण्यात आले.









पालकांशी संवाद साधताना

ज्या विद्यर्थ्यांना विशेष उपचाराची (Higher Centre) आवश्यकता आहे व ज्या विद्यार्थ्यांची शारदा नेत्रालय येथे शस्त्रक्रिया करण्यात आली अशा विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या पालकांशी मा. रमेशजी अगरवाल श्रीमती सौ. विजय अगरवाल व सेहगल मॅडम यांनी संवाद साधला.

दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे शाळेतील नेत्र तपासणी शिबिर बंद असल्यामुळे नरव्हाळ भिलाटी येथे शाळाबाह्य मुला - मुलींना लिहिण्या वाचण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. डिसेंबर २०१८ मध्ये एमएसएसओ चे अध्यक्ष मा.श्री. जीवन कायंदे सर व सौ. कायंदे मॅडम यांनी प्रकल्पाला भेट दिली. येथे आले असता त्यांनी नरव्हाळ भिलाटी येथील प्रशिक्षनार्थीना भेटून शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. त्याचप्रमाणे जुनवने येथे जेष्ठ नागरिकांच्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला भेट दिली.








गणपती नेत्रालयात नेण्यात आलेले विद्यार्थी
विद्यार्थ्यांसोबत गणपती नेत्रालयाचे जन संपर्क अधिकारी व टीम

ज्या विद्यार्थ्यांवर शारदा नेत्रालयात उपचार होवू शकत नाही अशा ५ विद्यार्थ्यांना प्रकल्पातर्फे गणपती नेत्रालय जालना येथे नेण्यात आले. यामध्ये सागर (मागील न्यूज लेटर मधील) चा समावेश होता. तेथे त्याच्या डाव्या डोळ्याची शस्त्रक्रिया करण्यात आली व इतर ४ विद्यार्थ्यांना वेग-वेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया सुचविण्यात आल्या आहेत. परंतु यातील काही शस्त्रक्रिया शासनाच्या योजनेत नाहीत तर ज्या शस्त्रक्रिया योजनेमध्ये आहेत त्यासाठी विद्यार्थ्यांचे लागणारे कागदपत्रे अपूर्ण आहेत यामुळे हे काम आव्हानात्मक आहे.

डिसेंबर महिन्याच्या अखेरीस **Rotary Club of Pure Pride** सदस्यांनी संस्थेच्या इतर उपक्रमांबरोबर या प्रकल्पाची संपूर्ण माहिती समजावून घेतली.



We accept donation from well wishers

- *Bank account: Account No. – 48310010006917*
  IFSC Code: SBIN – IBKL0000483
  IDBI Bank, Lane No. 6, Dhule (Maharashtra)
- *Email Id : eyeproject_dhl@yahoo.in*

K S Wani Memorial Trust Reg. No. E-352

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित

रेऊ वाणी विज्ञान विहार

त्रैमासिक महिती पत्र (ऑक्टोबर- डिसेंबर २०१८)

(For Private Circulation only)

दरवर्षी होणाऱ्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या द्वितीय फेरीत रेऊ वाणी विज्ञान विहाराचे ६ वी चे तीन व ९ वीच्या एका विद्यार्थिनीची निवड झाली आहे. द्वितीय फेरीच्या पूर्व तयारीसाठी ६ वी च्या सात विद्यार्थ्यांची व नववीच्या तीन विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यात आलेल्या पैकी ६ वी च्या शाश्वत रवींद्र देवरे विद्यार्थ्याची तृतीय फेरीत निवड झाली आहे.









दि. ७/१०/२०१८ रोजी डॉ.व्ही. आर. भागवत सरांचे'स्लाईड शो'च्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी पक्ष्यांची आवश्यकता या विषयावर मार्गदर्शन झाले . मार्गदर्शन करत असताना सरांनी वेगवेगळ्या पक्ष्यांची ओळख करून देत पर्यावरणातील पक्ष्यांचे महत्व पटवून दिले.





दि.२२ /१०/२०१८ रोजी MSSO कॅनडाचे प्रतिनिधी श्री . रमेशजी अगरवाल सर, सौ. विजय अगरवाल व मधु सेहगल यांनी रेऊ वाणी विज्ञान विहाराला भेट दिली. अशी प्रयोगशाळा हुशार , प्रामाणिक गरजू विद्यार्थांसाठी फार आवश्यक आहे तसेच ज्यांना भावी आयुष्यात वैज्ञानिक व्हायचे आहे त्यांची स्वप्ने पूर्ण होण्यासाठी सहाय्यकारी ठरेल असे प्रतिपादन मधु सेहगल यांनी केले .



दि.१/१२/२०१८ रोजी रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या द्वितीय फेरी साठी निवड झालेल्या ६वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या रोपांची व बियांची ओळख होण्यासाठी धुळे येथील कृषी महाविद्यालयाला भेट दिली.

दि. ५/ १२/ २०१८ रोजी MSSO चे अध्यक्ष श्री. जीवन कायंदे व सौ. सिद्धी कायंदे यांनी विज्ञान विहारात भेट दिली. त्यावेळी होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेसाठी तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रयोग वर्गाच्या सराव परीक्षा सुरु होत्या.









दि.९ /१२/२०१८ रोजी श्री .व्ही.वाय.दाबके सरांनी 'दुर्बिणीचे जगत' या विषयावर 'स्लाईड शो' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुर्बिणीचे कार्य व त्यांचे वेगवेगळे प्रकार सरांनी समजावून सांगितले.

दि २२/१२/२०१८ रोजी Rotary Club of Pure Pride च्या सदस्यांनी संस्थेच्या उपक्रमांबरोबर रेऊ वाणी विज्ञान विहार व बोटॅनिकल गार्डनला भेट दिली.



We accept donation from well wishers

- *Bank account: Account No. – 10410684138*
  IFSC Code: SBIN – 0001938
  State Bank of India, Pramod Nager Branch, Deopur, Dhule (Maharashtra)
- *Email Id : vjsongire@gmail.com*

K S Wani Memorial Trust Reg. No. E-352

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था उपक्रम

(ऑक्टोबर– डिसेंबर २०१८)

(For Private Circulation only)

भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे तिसावे अधिवेशनाचे आयोजन :

यदाचे भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे तिसावे अधिवेशन व राष्ट्रीय चर्चासत्र स्वामी रामनंद तीर्थ माराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि नूतन महाविद्यालय सेलू, जि. परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सेलू येथे दि.८ व ९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. सदर अधिवेशनाचे उद्घाटन स्वामी रामनंद तीर्थ माराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते व सुप्रसिद्ध साहित्यिक विचारवंत प्रा.डॉ.यशवंत मनोहर यांच्या अधक्षतेखाली होणार आहे. अधिवेशनात कवयित्री ब. चौधरी उ.म. विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.के.बी. पाटील , का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी.ए. शशिकांत धामणे, सचिव प्रा. डॉ. शोभा शिंदे , विश्वस्थ प्रा. डॉ .एम .एन .जैन आदी मान्यवर उपस्थित राहतील. चर्चासत्र विषयाचे बीजभाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. उमेश बगाडे हे करतील. दोन दिवसीय पाच सत्रामध्ये अभ्यासपूर्ण शोधनिबंधाचे वाचन होणार आहे.





जळगाव येथील महिला महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

जळगाव येथील महिला महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन व विक्री

जळगाव येथील एस. एन. डी.टी. महिला महाविद्यालयात दि. १७ व १८ नोव्हेंबर २०१८ रोजी क्रांतीसिह नाना पाटील अकादमी आणि प्रागतिक इतिहास परिषद आयोजित चर्चासत्राच्या कार्यक्रमासाठी का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेतर्फे ग्रंथालय विभागकडून ग्रंथप्रदर्शन व विक्रीसाठी संस्थेत प्रकाशित झालेली पुस्तके ठेवण्यात आली होती. सदर प्रदर्शनात "आमची श्रीवणी " चे अंक उपलब्ध करून देण्यात आले होते. यावेळी वर्गणीदारीनी नावनोंदणी केली. ग्रंथपाल मिलिंद दीक्षित यांनी संयोजन केले.



प्रा. डॉ. वंदना महाजन

प्रा. डॉ. वंदना महाजन यांना लोकमंगल फाउंडेशन तर्फे "उत्कृष्ट लेखिका पुरस्कार"

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ. वंदना महाजन यांना लोकमंगल फाउंडेशन तर्फे २०१८ चा "उत्कृष्ट लेखिका पुरस्कर" प्रदान करण्यात आला. स्त्रीवादी समीक्षा आणि साहित्य लेखनात त्याचे भरीव योगदान आहे. संस्थेच्या विविध उपक्रमात/ प्रकल्पात त्याचे उत्तम संयोजन असते. उत्कृष्ट लेखिका पुरस्कार मिळाल्याबद्दल का.स.वाणी संस्थेच्या विश्वस्त पदाधिकारी व सहकारी कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

We accept donation from well wishers

- *Bank account: Account No. – 35147550561*
  IFSC Code: SBIN – 0001938
  State Bank of India, Pramod Nager Branch, Deopur, Dhule (Maharashtra)
- *Email Id : kswprint@gmail.com*